# महाशिवरात्रीचे आध्यात्मिक रहस्य

महाशिवरात्री ही माघ महिन्यातील चतुर्दशीला अमावस्येच्या एक दिवस आधी साजरी केली जाते. परमपिता परमात्मा शिवाचे अवतरण ह्या सृष्टीवर कलियुग पूर्ण व्हावयाच्या काही वर्ष आधी झाले होते. जेव्हा की सारी सृष्टी अज्ञान अंधकारात होती. यामुळेच शिव शब्दाचा संबंध रात्रि शब्दाशी जोडला जातो. आणि शिवाच्या रात्रि पूजा करण्याच्या विधीला अधिक महत्व दिल जात. श्री नारायण किंवा श्रीराम ह्या देवतांच पूजन दिवसा होत, कारण श्री नारायण आणि श्रीरामाच्या जन्म क्रमश: सतयुग आणि त्रेतायुगात झाला होता. मंदिरात ह्या देवतांना रात्रि झोपवल जात आणि दिवसा उठवलं जात, परंतू परमात्मा शिवाच्या पूजेसाठी भक्तगण स्वत: रात्रि जागरण करतात.

आज पूर्वलिखित रहस्याला न समजल्याने काही लोक अस म्हणतात कि 'शिव' हे तमोगुणांचे प्रेरक आहेत. त्यामुळे त्यांची पूजा रात्रि होते आणि शिवरात्रिही रात्रीच साजरी केली जाते. कारण रात्र ही तमोगुणांची प्रतिनिधी आहे. परंतू त्यांची ही समजूत अगदी चूक आहे. कारण वास्तविक शिव हे तमोगुणांचे प्रेरक नसून ते त्यांचे संहारक अथवा नाशक आहेत. जर शिव हे तमोगुणांचे प्रतिनिधी असते तर त्यांना शिव म्हणजे कल्याणकारी, पापकटेश्वर, मुक्तेश्वर म्हणण निरर्थक झाल असत. शिव याचा अर्थ आहे कल्याणकारी शिव भगवानाचे कर्तव्य आहे की सर्व आत्म्याचं कल्याण करणे व तमोगुणाचा अर्थ आहे, अकल्याणकारी जे की पापवर्धक व मुक्तिला बाधक आहे.कल्पाच्या शेवटी परमात्मा शिव हे अवतरित होऊन अज्ञानता, दुख: अशांतीला समाप्त करता म्हणून खरतर शिवरात्री साजरी केली जाते.

शिवरात्री अशी साजरी करु या -

भक्त लोक शिवरात्रीच्या दिवशी सगळी रात्र जागरण करतात आणि जेवल्याने आळस व झोप, मादकतेचा अनुभव येईल म्हणून त्यादिवशी ते जेवण करीत नाहीत, उपवास करतात व त्यामुळे भगवान शिव प्रसन्न होईल अशी धारणा असते. खऱ्या अर्थाने मनुष्याला तमोगुणात ढकलणारे तर पाच मनोविकार आहेत. जोपर्यंत मनुष्य त्या विकारांचा त्याग करत नाहीत तोपर्यंत त्याच्या आत्म्याचं पूर्ण जागरण होऊच शकत नाही व आशुतोष भगवान शिव पण त्यांच्यावर प्रसन्न होत नाही. कारण स्वत: भगवान शिव हे 'कामारि ' मनुष्यावर कसे प्रसन्न होतील ? माघ महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्थीच्या रात्री साजरा केला जाणारा शिवरात्री महोत्सव हा कलियुगातील त्या शेवटच्या वर्षाचं प्रतिक आहे की, ज्यात भगवान शिवाने मनुष्याला ज्ञानाद्वारे पावर करुन त्याच कल्याण केल होत. खरतर शिवरात्री हे व्रत संबंध वर्षभर साजर करायला हव, कारण वर्तमान संगमयुगात परमात्म्याचं अवतरण झालेल आहे. त्या कलियुगी सृष्टीचया महाविनाशाची सामग्री ॲटम, हायट्रोजन, परमाणु बॉम्बच्या रुपात तयार आहे व परमप्रिय परमात्म्याद्वारे विश्व नवनिर्माणाचं कार्यही संपन्न होत आहे. आता महाविनाशाच्या वेळेपर्यंत ब्रह्मचर्य व्रताच पालन करा. त्यामुळे मनोविकारांवर ज्ञानयोगाद्धारा विजय प्राप्त करु शकू, हेच महाव्रत आहे की जे शिवव्रत नावाने प्रसिध्द आहे. आणि हाच शिवाचा मंत्र आहे की जो 'तारक मंत्र' नावाने प्रसिध्द आहे. ईश्वरीय ज्ञानयोगाच्या आधारे स्वत:स रात्रीतून (अज्ञानतेतून) दिवसाकडे (प्रकाशाकडे) नेण्याची महाशिवरात्री खऱ्या अर्थाने साजरी करु या .

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com